पुढच्या २५-५० वर्षांचा विचार केला तर जगात आशियाई बाजारपेठेला, किंबहुना भारतीय बाजारपेठेला प्रचंड मागणी असणार आहे. विकसित बाजारपेठ म्हणून अन्य देशांना भारताबरोबरच अधिक व्यवहार करावे लागतील. त्यामुळे भारतीय केस स्टडीजचा अभ्यास करणं भाग आहे. परदेशी युनिव्हर्सिटीतून केवळ तिथल्याच केस स्टडीजचा अभ्यास केला तर भविष्यातली मार्केटची मागणी कशी पूर्ण होईल? यासाठीच आपल्या देशातली शैक्षणिक क्षमता वाढवायला हवी.

नंदू पुरंधर

'एमईटी'ची स्थापना कशी झाली?

भारतात, त्याहूनही मुंबईत एखादी जागतिक दर्जाची शिक्षण संस्था असावी, हा विचार बऱ्याच वर्षांपासून माझ्या मनात होता. १९८९ची गोष्ट आहे, याबाबत मी एका संस्थाकाळी छगन भुजबळांना सहज बोलून गेलो. भुजबळ यासाठी लगेच तयार झाले. इतक्या झटपट 'एमईटी'चा जन्म झाला.

नंतर जागेचा शोध सुरू झाला. तोपर्यंत काही वर्कशॉप, ॲक्टिविटी सुरू केल्या. माझ्या दादरच्या ऑफिसमधूनच ही सूत्रं हलवत होतो. मग कळलं की, वांद्रे इथे अगदी मोक्याच्या ठिकाणीच म्युन्सिपल कार्पोरेशनचा प्लॉट शैक्षणिक वापरासाठी देयला होता. तुम्ही प्लॉट द्या, आम्ही शैक्षणिक संस्था बांधू, असं मी सुचवलं. वर्ष, जागतिक दर्जा असलेली आणि खऱ्या अर्थाने जिथे प्रोफेशनल्स घडतील अशी शैक्षणिक संस्था आम्हाला काढायची होती. पण पारिचमात्य युनिव्हर्सिटीचं अंधानुकरण करायचं नव्हतं. आपली सांस्कृतिक आणि शैक्षणिक मूल्यं जपून तांत्रिकदृष्ट्या सक्षम अशी शिक्षण संस्था इथे आणायची होती. 'एमईटी इज अ प्लेस वेअर ट्रेडिशन ॲण्ड टेक्नॉलॉजी घेऊन मुलांसाठी माध्यमाची निवड केली जातेय, ती संकल्पना प्रबळ मला बदलायचीय. इंग्रजी एक भाषा आहे, ते ज्ञान नाही.

जे भारतीय 'यशस्वी' या व्याख्येत बसतात त्यातले ९० टक्क्यांहून अधिक प्रादेशिक भाषेतून शिक्षण घेऊनच पुढे आले आहेत. मी अशा सगळ्या यशस्वी व्यक्तींची एक यादी बनवतोय. तुम्हाला इंग्रजी येणं, हा एक कलेचा, संभाषणकौशल्याचा भाग आहे. इंग्रजीत तुम्ही विचार करणंही काही वावगं नाही. मात्र मातृभाषा महत्त्वाची आहे, त्यातून विचार करताना त्यात तुमचे संस्कार असतात.

याचं मूळ कुठे आहे, असं वाटतं?

'संगोपन' या शब्दाला जोडूनच एक शब्द आहे, 'संस्कार'. बालपण, संगोपन आणि विकास या तिन्ही गोष्टींसाठी महत्त्वाचं असतं ते मातृत्व, संस्कार आणि मार्गदर्शन (मेण्टॉरिंग). पूर्वी एकत्र कुटुंब पद्धतीमुळे जे नैसर्गिक मेण्टॉरिंग व्हायचं ते आता होत नाही. शिक्षणसंस्थेत एकावेळी १००० मुलं शिकत असतात. त्यांच्याकडे वैयक्तिक लक्ष देणं शक्य नसतं. त्यांना साहित्यिक वाचही मिळत नाही. उरतं ते फक्त मातृत्व.

किती यशस्वी आहात, हे तुमच्या अर्निंग कपॅसिटीवर नाही तर लर्निंग कपॅसिटीवर अवलंबून असतं.

प्रत्येक देशाचा ह्युमन इण्डेक्स मोजला जातो. पूर्वी तो दरडोई उत्पन्नावर मोजला जायचा नंतर त्यात जन्मप्रमाण, आरोग्य, मानवी कायदे, जैरवर्तन अशा गोष्टी ग्राह्य धरल्या जाऊ लागल्या. आता त्यात 'हॅपीनेस इण्डेक्स'ही जगला जाया, असं भूतान या राष्ट्राने सुचवलं आहे. जेव्हा वैयक्तिक पातळीवर हा 'हॅपीनेस इण्डेक्स' पॉझिटिव्ह असेल तरच तो संपॅटिरिय्या दिसू शकेल.

'एमईटी'मध्ये शिक्षणाव्यतिरिक्त मेण्टॉरिंग कशाप्रकारे केलं जातं?

'एमईटी'च्या प्रत्येक कोर्समध्ये सात दिवसांची एक कॅप्सूल असते. त्यात मनःशक्तीसाठी श्वासाचे व्यायाम, योगशायना, मेडिटेशन, प्राणायम, खाण्याच्या चांगल्या सवयी या गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे. मानसशास्त्रज्ञांद्वारे वैयक्तिकरित्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केलं जातं.

या सर्व गोष्टी मूल लहान असतानाच होणं गरजेचं आहे. पण जर नाही झाल्या तर जिद्दान 'एमईटी' मध्ये

असताना तरी व्हाव्यात हाच आमचा प्रयत्न आहे. मुलांचं शरीर, मन सक्षम करण्याबरोबरच त्यांच्यात सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी सोशल ॲक्टिव्हिटीद्वारे त्यांना समाजातल्या सत्यपरिस्थितीची जाणीव करून दिली जाते. संवेदनशील मनच सक्षम समाज घडवू शकतो, हा त्या मागचा विचार असतो.

नवनवीन परदेशी युनिव्हर्सिटीज भारतात येत आहेत. मूलभूत गोष्टींचाच अभाव असताना एक मोठं आव्हान आपल्यासमोर आहे, असं नाही का वाटत?

आपल्या देशाच्या सद्यस्थितीनुसार मूलभूत गरजा पूर्ण करणं हेच प्रत्येक शिक्षणसंस्थेपुढचं मोठं आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर परदेशी युनिव्हर्सिटीजमुळे निर्माण होणारी स्पर्धा आणि आव्हानं ही तर फार दूरची गोष्ट आहे. आपल्याकडचं नोकरशाहीचं प्रमाण पाहता परदेशी युनिव्हर्सिटीज इथे येतील. पण टिकतील का याबद्दल माझ्या मनात साशंकता आहे. दुसरा मुद्दा असा की, त्या युनिव्हर्सिटीज भारतात आल्या आणि टिकल्या तरी किती टक्के भारतीय विद्यार्थी तिथे जातील? कारण मुळात परदेशी शिक्षणासाठी जाणाऱ्या भारतीय मुलांचं प्रमाणच किती आहे, ते पाहा. अशा मुलांनाच त्या युनिव्हर्सिटी लक्ष्य करतील. त्यामुळे आपल्या शिक्षण संस्थांवर फारसा फरक पडणार नाही.

तसं असलं तरी या फॉरेन युनिव्हर्सिटीजच्या गुणवत्तेचे निकष काय लावायचे? भविष्यातलं चित्र सर्वसामान्यांच्या मनात संभ्रम निर्माण करणारं नसेल का?

माझ्याकडे गेल्या दहा वर्षांत अशा अनेक फॉरेन युनिव्हर्सिटीज आल्या ज्यांना 'एमईटी'शी टाय-अप करावयं होतं. पण दोन्ही संस्थांचा अभ्यासक्रम एकत्र करून त्यात शैक्षणिक मूल्यांची भर घालता आली तरच अशा युनिव्हर्सिटीशी टाय-अप करण्यात अर्थ आहे. खरंतर आपल्या आयडी सिलॅबसपेक्षा ते खूप मागे आहेत. ज्या १५० वर्षं जुन्या फॉरेन युनिव्हर्सिटीज आहेत, त्या नक्कीच दर्जेदार आहेत. तसा त्यांच्या आणि आपल्या अभ्यासक्रमात फारसा फरक नाही, फरक आहे तो संशोधनातला.

त्यांच्याकडूनही आपण संशोधन हा गुण घेऊ शकतो. शिवाय भारतीयच तिथे जाऊन अधिक संशोधन करताना दिसतील. याचं कारण अशा संशोधनासाठी आपल्याकडे माफक सुविधा उपलब्ध नाहीत. दुसरी गोष्ट अशी की, पुढच्या २५-५० वर्षांचा विचार केला तर जगात आशियाई बाजारपेठेला, किंबहुना भारतीय बाजारपेठेला प्रचंड मागणी असणार आहे. ती एक गरज बनेल. विकसित बाजारपेठ म्हणून अन्य देशांना भारताबरोबरच अधिक व्यवहार करावे लागतील. त्यामुळे भारतीय केस स्टडीजचा अभ्यास करणं भाग आहे. परदेशी युनिव्हर्सिटीतून केवळ तिथल्याच केस स्टडीजचा अभ्यास केला तर भविष्यातली मार्केटची मागणी कशी पूर्ण होईल? यासाठीच आपल्या देशातली शैक्षणिक क्षमता वाढवायला हवी.

पुढल्या २५ वर्षांत तरी आपली कोणासोबतही स्पर्धा होऊ शकत नाही. असेल तर ती स्वतःशीच आहे. दर्जात्मक शिक्षण देणाऱ्या अजून किमान ५००० शिक्षणसंस्थांची भारताला गरज आहे. आपण मुळात ही गरजच पूर्ण करू शकत नसू तर स्पर्धेचा प्रश्न येतोच कुठून?

आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतु हुशार विद्यार्थ्यांसाठी 'एमईटी'मध्ये कोणत्या सुविधा आहेत?

जागतिक दर्जाची शिक्षणसंस्था उभारायची तर त्यासाठी खर्च नक्कीच जास्त आहे. त्या कोर्सेससा सरकार ठराविक फी आकारतं, तिचे तोच्यात जाऊन शिक्षण द्यावं लागतं. पण दर्जात्मक तडजोड मला मान्य नाही. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्यांसाठी काहीतरी करण्याची इच्छेतून सात-आठ वर्षांपूर्वी एक फ्री-शीप योजना सुरू केली. त्याअंतर्गत प्रत्येक वर्षी प्रत्येक कोर्समध्ये दोन जागा फ्री-शीप म्हणून असतात. या विद्यार्थ्यांना 'एमईटी'मध्ये पूर्णतः मोफत शिक्षण दिलं जातं. ज्यांना मेरिटमध्ये प्रवेश मिळतो असे विद्यार्थी यासाठी प्रवेशअर्ज भरू शकतात. त्यासाठी एक फ्री-शीप कमिटीही 'एमईटी'मध्ये आहे.

कॅम्पस रिक्रुटमेण्टद्वारे 'एमईटी'मध्ये विद्यार्थ्यांना कसा वाव मिळतो?

'एमईटी'मध्ये प्रत्येक कोर्समाठी प्लेसमेण्ट दिली जाते. यासाठी 'एमईटी'मध्ये खास प्लेसमेण्ट डिपार्टमेण्ट आहे. हे डिपार्टमेण्ट केवळ वर्षाच्या शेवटीच काम करत नाही. वर्षभर ते डिपार्टमेण्ट मार्केटचा रिसर्च करतं. वेगवेगळ्या संस्थांमध्ये जाऊन ठेटाबेस तयार करतं. विविध कंपन्यांचे व्यवस्थापक आणि तज्ज्ञ यांना 'एमईटी'मध्ये आमंत्रितही केले जातं. त्यानुसार विद्यार्थ्यांना मोठमोठ्या कंपन्यांत चांगल्या पदावर संधी उपलब्ध करून दिल्या जातात.

जागतिक संधी कितपत उपलब्ध होतात?

जागतिक संधींचं प्रमाण दरवर्षाला वाढत आहे. आखाती देशांमध्ये अधिकाधिक संधी आहेत. शिवाय जागतिक प्लेसमेण्ट प्रक्रियेत माजी विद्यार्थी जे परदेशात मोठ्या पदांवर कार्यरत आहेत, त्यांच्यादवारे विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून दिल्या जातात. मेण्टॉरिंग प्रक्रियेतही हे माजी विद्यार्थी येणाऱ्या नव्या विद्यार्थ्यांना 'ऑनलाइन मेण्टॉरिंग' करत असतात.

- आरती कुहीकर
arti.kuhikar@timesgroup.com

भारतानेच सक्षम होणं आवश्यक

मिट' हे आमचं ब्रीदवाक्यच आहे. केवळ करिअरमध्येच नव्हे तर जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर यशस्वी व्हेरल असं व्यक्तिमत्व घडवणं हे 'एमईटी'चं उद्दिष्ट आहे. सांगायला अभिमान वाटतो की, बुनायटेड नेशन्सने २००३ मध्ये एमईटीला 'स्पेशल कन्सल्टेटिव्ह स्टेटस' प्रदान केलं आहे.

आज मराठी माध्यमांच्या शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत, याबद्दल काय सांगाल?

आज केवळ मराठीच नाही तर इतर भाषिक शाळांची अवस्थादेखील बिकट बनली आहे. ज्या बंद नाही झाल्या त्यांचं इंग्रजी वा कॉन्वेण्ट शाळांमध्ये रूपांतर झालं आहे. असं असण्याला एक गोष्ट कारणीभूत आहे. लोकांच्या मनात फार मोठा गैरसमज आहे. त्यांना इंग्रजी माध्यम म्हणजे हमखास यश असं वाटू लागलंय. या चुकीच्या संकल्पनेवर जो निर्णय खरी समस्या ही आहे की या संस्काराशिवाय जी मुलं मोठी झाली आहेत, ती आता पालकावस्थेत येत आहेत. संस्काराचा भाग जीवनात नसल्याने एक कमकुवत पिढी निर्माण होतेय. आत्महत्यांचं प्रमाण का वाढलंय? कारण मुलांमध्ये कोणत्याही प्रसंगी शांत चित्ताने विचार करण्याची क्षमताच नाही. तुमचं मन जीवनातले सगळे रस ग्रहण करण्याइतपत सुदृढ असेल आणि मूलभूत गोष्टीतच तुम्ही सक्षम नसाल तर मग इतर कलांमध्ये प्राविण्य मिळवून उपयोग काय? एकीकडे आपण म्हणतो, की जागतिक स्पर्धेला तोंड द्यायचं. पण मनच दुर्बल असेल तर तुमच्यात हे धातुर्य तरी कुठून येणार? हे सर्व जडणघडण प्रक्रियेतून सहज होत असतं. हा मूलभूत पायाच नष्ट होत असल्याने यशाचे इमले कसे उभे राहतील? अशा मूलभूत गोष्टींचा शिक्षणात समावेश करण्याशाठी सरकारला मात्र वेळच नाही.

पालकांकडून नैसर्गिक मेण्टॉरिंग कसं व्हायला हवं?

पालकांनी आपल्या मुलांना केवळ मोठा प्लॅटफॉर्म मिळवून देण्यापलीकडे काहीही करू नये. बहुधा पालक आपल्या इच्छा-अपेक्षा मुलांवर थोपवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे मुलं खुलेपणाने बोलत नाहीत. नेमकं काय करायचंय याबाबत त्यांचाही गोंधळ उडतो. एखाद्या क्षेत्रातल्या संधी-सुविधांबद्दल पालकांनी मुलांना नक्कीच मार्गदर्शन करायं, पण त्याशाठी प्रथम पालकांनी अपडेट असायला हवं. खरंतर आपल्याकडे कौन्सेलिंगच नीट होत नाही. मुलांना त्यांची आवड आणि करिअर यांची सांगड घालायला शिकवा. तुम्ही

'मुंबई एज्युकेशनल ट्रस्ट'चे फाऊण्डर सुनील कर्वे यांना सगळेच ओळखतात. पण एक मित्र म्हणून, रसिक म्हणून ते कसे आहेत, हे सांगताहेत त्यांचे काही सुहृद...

शिक्षणक्षेत्रातला श्रीकृष्ण

सुनील कर्वे हे एक शिक्षणक्षेत्रातलं तरुण, तडफदार नेतृत्व आहे. 'एमईटी' शिक्षणसंस्थेचा एवढा मोठा विस्तार होण्यात सुनीलचा सिंहाचा वाटा आहे. 'एमईटी'च्या विविध कोर्सेसमुळे एकूण शिक्षणक्षेत्रात मोठं काम झालं आहे. पण महत्त्वाचं म्हणजे हे सर्व कोर्सेस तळागाळातल्या विद्यार्थ्यांनाही उपलब्ध झाले आहेत. अशा गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी सुनीलने स्कॉलरशिप योजना सुरू केली आहे. त्यासाठी एक कमिटी तयार करण्यात आली आहे. तिच्या माध्यमातून खऱ्या गरजू विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. या कमिटीवर मीही काम केलं असल्याने ती प्रक्रिया कशी असते, हे मी जवळून बघितलं आहे.

'एमईटी'मध्ये केवळ पुस्तकी ज्ञान दिलं जात नाही. तिथं थेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला प्रॅक्टिकल नॉलेज देण्यावर भर दिला जातो. कसं बोलायचं, कसं वागायचं, काम कसं करून घ्यायचं हेसुद्धा शिकवलं जातं. अर्थात या सर्वांच्या पाठीमागे सुनीलची दूरदृष्टी काम करते.

अशाच काही विद्यार्थ्यांनी मला डिझास्टर मॅनेजमेण्टवरच्या सीडीज तयार करून दिल्या होत्या. 'एमईटी'च्या कोर्सेसची फी किती असावी, हे निश्चित करण्याचीही 'एमईटी'ची एक प्रक्रिया आहे. त्यासाठी स्थापन केलेल्या शुल्क कमिटीतही काम करण्याचा मला अनुभव आहे. त्यामुळे 'एमईटी'च्या प्रत्येक गोष्टीत सुनीलने कशी शिस्त पाळली आहे, हे मला चांगलं ठाऊक आहे.

१९९५ ते २००० दरम्यान मी मुंबई विद्यापीठाची कुलगुरू होते. तेव्हा सुनील सिनेट मेंबर होता. सिनेटमध्ये कुठलाही मुद्दा असो, तो अत्यंत अभ्यासपूर्वक मांडण्यात सुनीलची सचोटी दिसायची. कारण विषयाची व्यवस्थित मांडणी करण्यात त्याचा हातखंडा आहे. एखाद्या मुद्दाला विरोध करण्याचीही त्याची एक खास पद्धत आहे. तो अत्यंत शांतपणे आपलं मत नोंदवतो. अशावेळी कसं बोलायचं ते सुनीलकडून शिकायला पाहिजे. माझ्यामते, तो शिक्षणक्षेत्रातला श्रीकृष्णच आहे. सुनीलची आपल्या कामावर प्रचंड श्रद्धा आहे. त्याचा कामाचा उरकही मोठा आहे. तो सतत काही ना काही काम करत असतो. एखादं काम हाती घेतलं की तो ते पूर्ण करणारच. एखाद्या मीटिंगला कितीही वेळ झाला तरी तो पूर्णवेळ थांबतो. सुनीलच्या आणखी एका गुणाचा मला आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. कुणाच्याही मदतीला धावून जाण्याचा फार दुर्मिळ गुण त्याच्यामध्ये आहे. तो केवळ मोठ्या लोकांचाच सहकार्य करत नाही तर सामान्य आणि तळागाळातल्या लोकांनाही मदतीचा हात देतो.

- डॉ. स्नेहलता देशमुख
माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ
(शब्दांकन : राजेश वाघमारे)

रसिक मनाचा



सुनील कर्वे आणि माझी दोस्ती ही गाणं-बाजवणं या एका बेसवरच अगदी घट्ट आहे. मी परमेश्वराला असंच म्हणेन की जोपर्यंत मी या दुनियेत आहे तोपर्यंत कर्वेसारखा रसिक, अत्यंत मनापासून प्रेम करणारा दोस्त सतत जवळ राहो.

- सुरेश वाडकर
गायक

भूतदया

मी 'एमईटी'मध्ये इलेक्ट्रिकल मेण्टेनन्स विभागात काम करतो. एकदा मी सेकण्ड शिफ्टला होतो. दुपारी तीन-चारची ती वेळ होती. सातच्या मजल्यावर मला एक घार बेशुद्धावस्थेत दिसली. उष्णता सहन न झाल्यामुळे ती बेशुद्ध झाली होती. काय करावं सुचेना. मी पुरता गोंधळलो होतो. मनाचा हिय्या करून मी घारीला हातात घेतलं. पण तिचं पुढे काय करायं, हे माहीत नव्हतं.

सातव्या मजल्यावर घार सापडल्याची बातमी एव्हाना सगळीकडे पसरली. सुनील कर्वेंना ही बातमी कळल्यावर ते मीटिंगमधून बाहेर आले. त्यांनी घारीला पाणी पाजायला सांगितलं. एवढा मोठा माणूस स्वतःहून घारीची काळजी घेतोय हे पाहून मला खूप समाधान वाटलं आणि हुरूपही आला. त्यांनी एका व्हेटरनरी डॉक्टरला फोन केला तेव्हा त्या डॉक्टरांनी घारीला परळच्या व्हेटर्नरी हॉस्पिटलमध्ये नेण्याचा सल्ला दिला.

कर्वेंनी त्याप्रमाणे मला त्या घारीला हॉस्पिटलमध्ये नेण्यास सांगितलं आणि तिच्यावर औषधोपचार करायला सांगितले. त्यांनी स्वतःची गाडी देऊन घारीला हॉस्पिटलमध्ये न्यायला सांगितलं.

कर्वेंनी जातीने लक्ष घातल्यामुळे मी घारीला हॉस्पिटलपर्यंत नेऊ शकलो. त्यांनी दुर्लक्ष केलं असतं तर कदाचित मीसुद्धा तिच्याकडे दुर्लक्ष केलं असतं आणि ती घार तशीच निपचित पडून राहिली असती. सुनील कर्वेंमुळे घारीचे प्राण वाचवण्यात मी खारीचा वाटा उचलला.

- संतोष सावंतवे

रफीचा चाहता



सुनील कर्वे आणि माझा जन्मदिवस एकच, २३ सप्टेंबर १९५९. दोघांच्या जन्माची वेळही पहाटेचीच होती. 'छबिलदास'च्या बालवाडी ते पोद्दार कॉलेजातल्या बी.कॉम.पर्यंतचं शिक्षणही आम्ही एकत्रच घेतलं. शाळेत असताना आमची मधली सुटी सुनीलच्या घरीच जायची. लग्नानंतरही आमचा ग्रुप तुटला नाही.

आजही आम्ही आठवड्यातून एकदा तरी या ना त्या कारणाने भेटतोच. दरवर्षी आऊटिंगलाही जातो. सुनील एक शांत, मितभाषी आणि संयमी माणूस आहे. तो सारासार विचार करूनच बोलतो. म्हणूनच माझे वडील विद्याधर ओखलेसुद्धा 'रंगशारदा प्रतिष्ठान'बाबत काही निर्णय घ्यायचा झाल्यास सुनीलचा सल्ला घ्यायचे. विचार, विद्वत्ता आणि सामान्यज्ञान भरपूर आहे, त्यामुळे तो मेहमीच आम्हाला योग्य सल्ला देतो. आजही गोखले कुटुंबिय महत्त्वाचा निर्णय घेण्यापूर्वी तो सुनीलच्या कानावर घालतात.

सुनील हा उत्तम गायक आहे. तो मोहम्मद रफीचा चाहता आहे. रफीची सगळीच हिंदी गाणी त्याला तोंडपाठ आहेत. तो शाळेत असल्यापासून गायचा. आजही आम्ही भेटल्यावर तो अनेकदा गात असतो. 'पुकारता चला हूँ मैं, गली गली बहार की' हे त्याचं फेव्हरिट सॉंग. सुरेश वाडकरांचं 'दयाघना' हेही मेहमी त्याच्या तोंडी असतं. तो चांगला तबलावादकही आहे. ताल-सुरांची त्याला चांगली जाण आहे.

त्याच्याकडे व्यक्ती म्हणून बघताना विचारवंत, शिस्तप्रिय, संयमी, अभ्यासू, प्रामणिक, मदतगार, मार्गदर्शक असा आदर्श माणूस मेहमी भेटतो. त्याच्यात एक सहृदयी माणूसही दडलेला आहे,

ज्याच्याकडे संवेदनशील मनही आहे. तो गरजूंना मेहमीच प्रामणिकपणे आणि तळमळीने मदत करताना दिसतो. अनेक सामाजिक कार्यात तो हिरीरीने भाग घेतो. पण त्यात कसलाही दिखाऊपणा नसतो.

शाळेचे दिवस आठवले की लांब केस वाढवलेला सुनील डोळ्यासमोर येतो. सुरुवातीपासूनच तो हुशार होता आणि डीसेंडही. अगदी कॉलेजच्या शेवटच्या वर्षापर्यंत तो प्रचंड आक्रमक होता. पण पुढे प्रगल्भता येत गेली, तसा तो संयमी बनला.

पोद्दार कॉलेजमध्ये आमच्या ग्रुपने सलग चार वर्षं फोक डान्सचं पहिलं बक्षीस मिळवलं होतं. युनिव्हर्सिटीसाठीही आम्ही कॉलेजला रिप्रेझण्ट केलं होतं. कॉलेजमध्ये असतानाच सुनील भावनाच्या प्रेमात पडला आणि पुढे विवाह बंधनात अडकला.

सुनीलची 'एमईटी'मधली त्याची वाटचाल मी जवळून पाहिली असली तरी त्याबद्दल मी जास्त बोलणार नाही. पण जिद्द, मेहनत, सातत्य, तळमळ, निष्ठा, प्रामाणिकपणा या गुणांच्या बळावरच त्याने हे यश मिळवलं आहे.

- विजय गोखले
अभिनेते आणि
'रंगशारदा प्रतिष्ठान'चे विश्वस्त
(शब्दांकन : राजेश वाघमारे)